# शिक्षण मंडळ कार्यालय, पुणेमहानगरपलिका
## कै. भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना
## फेरनिविदा क्रमांक २०

शिक्षण मंडळ पुणे महानगरपलिका यांचेकडून खालील तपशीलात नमुद केलेल्या बाबींसाठी दोन लिफाफे (Two Bid System) पध्दतीने सिलबंद निविदा सक्षम संस्था,व्यक्ती, कंपनी यांचेकडून मागविण्यात येत आहेत. निविदा अर्जासोबत निविदा अटी व इतर सविस्तर माहिती वरील पत्यावर समक्ष मिळेल,पोष्टाने माहिती पाठविली जाणार नाही व पोष्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

| | |
|---|---|
| **१.कोरे निविदा प्रपत्र विक्री —** | निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून बुधवार दिनांक ०१/०९/२०१० पासून बुधवार दिनांक ०८/०९/२०१० पर्यंत कार्यालयीन वेळेत फक्त शिक्षण मंडळ कार्यालयात मिळेल. |
| **२. निविदा व बयाणा स्विकृतीची तारीख व वेळ —** | निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून गुरुवार दिनांक ०९/०९/२०१० रोजी दुपारी १ वाजे पर्यंत |
| **३. निविदा उघडण्याची वेळ** | गुरुवार दिनांक ०९/०९/२०१० रोजी दुपारी ३ वा किंवा कार्यालयीन सोयीनुसार निविदा भरणाऱ्यांच्या किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील. |
| **४. निविदा दर** | सर्व करांसह व वाहतुकींसह देणे आवश्यक आहे. |

| अ. क्र. | तपशील | विक्रीची अंदाजे रक्कम | फॉर्म किंमत |
|---|---|---|---|
| १ | **डेडस्टॉक, फर्निचरमधील फळया, तुटलेले लोखंडी सांगाडे, लोखंडी मोडक्या खुर्च्या, लोखंडी मोडकी कपाटे, सागवानाच्या लाकडी फळया, लाकडी मोडके टेबल,डेस्क, खुर्च्या लाकडी कपाटे, लाकडी पेटया, पितळी भंगार , मोडके प्लास्टिक व इतर भंगार वस्तूंची विक्री** | ४ लक्ष | ७५०/— |
| २ | **वूलनशाली व धार्मिक ग्रंथं** | १ लक्ष | ७५०/— |

**सूचना**

**१.** निविदा भरताना बयाणा रक्कम शेकडा १ टक्का व निविदा मान्य झाल्यावर शेकडा पाच टक्के अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. निविदा फॉर्म सोबत अटी,स्पेसिफिकेशन,निश्चित केलेली बयाणा रक्कम कार्यालयात भरून मुदतीत निविदा घेवून ती मुदतीत भरून देणे आवश्यक आहे.

२. कोणतीही निविदा स्विकारणे व नाकारणे हा मा शिक्षण मंडळाचा अधिकार आहे व राहील

**३.** सदर निविदा त्या संबंधीची सर्व माहिती पुणे मनपाच्या वेबसाईट www.punecorporation.org वर पाहण्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेली आहे व शिक्षण मंडळाचे नोटीस बोर्डवरही प्रसिध्द केली आहे.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरी/—** | **स्वाक्षरी/—** |
| **अध्यक्ष** | **शिक्षण प्रमुख,** |
| **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.** | **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.** |

**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**
**स्पेसिफिकेशन सन २०१० – ११**
**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक – ०९/०९/२०१०**
**वेळ – दुपारी – १.०० वा. पर्यंत**
**बयाना रक्कम रुपये : २,०००/–**
**डेडस्टॉक**

शिक्षण मंडळ, पुणे मनपा च्या सर्व शाळांतून फर्निचरचे व इतर नादुरुस्त साहित्य स्वखर्चाने उचलून घेवून जाणे व स्वच्छ करुन देणेबाबत –

१) लोखंडी भंगार – प्रति टनाचा दर दयावा.
२) सागवान लाकडी भंगार – प्रति टनाचा दर दयावा.
३) पितळी भंगार (नॉन फेरस) – प्रति किलोचा दर दयावा.
४) प्लास्टिक भंगार (फुगा) – प्रति टनाचा दर दयावा.
५) प्लास्टिक भंगार (कडक) – प्रति टनाचा दर दयावा.

**तपशील –**

तुटलेले लोखंडी डेस्क सांगाडे, लोखंडी मोडक्या खुर्च्या, लोखंडी मोडकी कपाटे, लाकडी मोडक्या फळया, लाकडी मोडके टेबल, लाकडी मोडके डेस्क, लाकडी खुर्च्या, लाकडी कपाटे, लाकडी पेटया, फुटलेली मोडकी पितळी भांडी, मोडके प्लास्टिक भंगार इतर संकीर्ण साहित्य.

**स्वाक्षरी/–**
**अध्यक्ष,**
**शिक्षण मंडळ, पुणे महनगरपालिका**

**स्वाक्षरी/–**
**शिक्षण प्रमुख,**
**शिक्षण मंडळ, पुणे महनगरपालिका**

# शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
# शिवाजी नगर, पुणे ४११००५.
# डेडस्टॉक विक्री निविदा अटी व शर्ती २०१०—११.

पुणे दैनिक सांजवार्ता व दैनिक केसरी दि. ०१/०९/२०१० मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर फेरनिविदा क्रं.२०/भांडार/**डेडस्टॉक विक्री कामी विहीत नमुन्यातील निवीदा फॉर्म व निवीदा खालीलप्रमाणेः—**

शिक्षण मंडळ पुणे म.न.पा. पुणे शैक्षणिक वर्ष २०१०—११ चे करिता खालील परिशिष्ठ अ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून, परिशिष्ट क मध्ये नमूद केलेल्या डेडस्टॉक **साहित्याची विक्री** विशिष्ट मुदतीत करण्यासाठी निविदा मागविण्यात येत असून, त्या निवीदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे.

**परिशिष्ठ अ**

**१. अटी व शर्ती :—**

१.निवीदा सीलबंद असली पाहिजे. दिलेल्या मुदतीत व वेळेत निवीदा आली नाही तर ती स्विकारली जाणार नाही.

२.निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असुन अ पाकीटमध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

**३अ.पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

**अ)** निवीदा रकमेच्या शेकडा १% या दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅकेचा मा. शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे काढलेल्या धनाकर्ष (DD) किंवा रोख भरणा कार्यालयात भरावा. २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ट १२ अन्वये संबंधित लघुउद्योगाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले तरच निवीदादारास बयाणा रक्कम व अनामत रकमेमध्ये सुट मिळेल अन्यथा त्याला एस.एस.आय.युनिट असले तरीसुध्दा बयाणा वरील रकमा रोख भराव्या लागतील.

**ब)** निवीदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र.

**क)**आर्थिक वर्ष २००९—१० मध्ये अद्ययावत व्हॅट भरल्याबाबतचा पुरावा जोडावा.

**इ)**शासन अंगिकृत व इतर संस्थांना **कडुन डेडस्टॉक साहित्य** खरेदीची अनुभवाची कागदपत्रे किंवा प्रमाणपत्र.

**ई)**निवीदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याचा नोंदणी प्रमाण पत्राची (Pan No.) छायांकित प्रत, तसेच मागील वर्षाचे इनकम टॅक्स रिटर्न प्रत.

**उ)** निवीदादार नोंदणीकृत सहकारी संस्था, नोंदणीकृत कपंनी किंवा नोंदणीकृत भागीदारी संस्था असेल तर संबंधित नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयीन संचालकांची किंवा भागीदारांची पुर्ण नावे, वय, पत्ते व संस्थेचे नोंदणीकृत दाखल्याची प्रत, संस्थेने सहीचे अधिकार दिल्याबाबतचे पत्र तसेच निवीदादार शासन किंवा शासन अंगिकृत संस्था असेल तर त्याबाबतची सर्व कागदपत्रे.

**ए)** व्यवसायकर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवश्यक.

ऐ) निवीदादाराची निवीदा कामाची पुर्तता करण्यासंबंधिची आर्थिक क्षमता असल्याबाबतचे बॅकेचे प्रमाणपत्र (बॅक सॉलव्हान्सी) चालू वर्षाची निवीदेच्या एकूण किमतीच्या किमान २५ टक्के रकमेचे.

ओ) अ पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना शिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणीचे वेळी ठेकेदारांना समक्ष कामी सादर कराव्या लागतील.

४.अ पाकीटमध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास ब पाकीट उघडण्यात येणार नाही. याबाबत मा शिक्षण मंडळाचा निर्णय अतिंम राहील.

५.पाकीट “ब” मध्ये निविदा धारकाने डेडस्टॉक साहित्याचे खरेदीचे सर्व करासह दर भरावेत व दोनही पाकीटे सिलबंद करून एका मोठया पाकीटात भरून त्या पाकीटावर निवीदा धारकाचे नाव, निवीदा क्रं.नमुद करून तो सिलबंद करून सादर करावा.

**६.निवीदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती.**

१. निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. **डेडस्टॉक साहित्य खरेदीचे** दर अंकी व अक्षरी लिहावेत.

२. निविदा स्विकारण्याचा,नाकारण्याचा पुर्ण अगर अशंत: मंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार मा.शिक्षण मंडळास राहिल.

३. निविदाकरिता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत संख्येत बदल करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे.

४.मान्य निवीदा धारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन ७ दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्राकावर करार करणे बंधनकारक आहे.करार करण्यास निविदादाराने लेखी स्वरूपात असर्मथता दर्शविल्यास बयाण रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतुन काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

५.मान्य निवीदादारास करार करतेवेळी **डेडस्टॉक साहित्याच्या जाहीर केलेल्या** एकूण किंमतीच्या ५% रक्कम सुरक्षा/अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (DD)किंवा रोखीने भरावी लागेल.

६.निवीदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष २०१०—११ करिताच करार केल्यापासून बंधन कारक राहतील.

७. बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रकमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

८. **डेडस्टॉक साहित्याची विक्री करणेकरिता** करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा.शिक्षण मंडळास राहिल.

९. दिलेल्या मुदतीत परिशिष्ठ ब मध्ये नमुदकेल्याप्रमाणे **डेडस्टॉक साहित्य शिक्षण मंडळ,पुणे मनपाच्या सर्व शाळांमधुन** न घेतल्यास निविदादाराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निवीदादारास ब्लॅकलिस्ट करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे व राहिल. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

१०.करारनाम्यानुसार विक्री करावयाचे **डेडस्टॉक** कार्यालयाने दिलेल्या मनपा शाळांमधुन स्वखर्चाने उचलण्याची जबाबदारी निविदादारावर आहे. मनपा शाळांमधुन डेडस्टॉकचे मुख्याध्यापकांच्या समक्ष वजन करुन होणारी रक्कम रोजच्या रोज मुख्याध्यापकांच्या सहीने

त्याचे चलन करुन शिक्षण मंडळ कार्यालयात जमा करावी व त्यानंतरच सदरचा डेडस्टॉक उलण्याची कार्यवाही सुरु करावी. डेडस्टॉक उचलताना सदर शाळेचे मुख्याध्यापकांच्या समक्ष उचलण्यात यावा.

११.एकदा भरलेली निवीदा रदद् करता येणार नाही एखादयाला ती जर रदद् करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा शिक्षण मंडळास राहिल

१२. मा.शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमुद केलेले काम मंजुर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम चेकने परत दिली जाईल. बयाणा रक्कम भरल्याची मुळ पावती मागणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१३.**डेडस्टॉक विक्री** बाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

१४.निविदा एकास/अनेकास देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार मा शिक्षण मंडळास आहे.

१५. निविदा दिनांक ०९/०९/२०१० रोजी दुपारी ३ वाजता किंवा मा.शिक्षण मंडळाचे सोईनुसार उघडण्यात येतील.वेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वत: किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्या दिवशी निविदा न उघडलयास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनी वरुन कळविण्यात येईल. वेळी व त्याप्रसंगी निविदादारास हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

पुणे.
दिनांक:—

| | |
|---|---|
| **स्वाक्षरी/—** | **स्वाक्षरी/—** |
| **अध्यक्ष** | **शिक्षण प्रमुख** |
| **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.** | **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.** |

## प्रतिज्ञालेख

मी,श्री.———————————————————————————— वय ————वर्ष, व्यवसाय – धंदा, राहणार ————या असून त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निविदा भरलेली आहे व निविदेसोबत मला अटी व शर्ती मान्य आहेत. म्हणून सदर प्रतिज्ञापत्रावर आज ——————————————————————————

निविदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,वरील निविदेच्या,फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल रोजी पुणे येथे सही करुन निविदेसोबत दाखल करित आहे.

पुणेः–

दिनांकः–

**पुरवठा धारकाची नाव,सही व शिक्का**

**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**
**स्पेसिफिकेशन सन २०१० – ११**
**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक – ९/०९/ २०१०**
**वेळ – दुपारी – १.०० वा. पर्यंत**
**बयाना रक्कम रुपये : १,०००/–**
**<u>वुलनशाली / धार्मिक ग्रंथ</u>**

१. **वुलनशाली :–** साईज २४० से.मी.गुणिले ११५ सेमी.,

रंग:– पांढरा रंग चांगल्या प्रतीच्या वुलन शाली

बॉर्डर:– चॉकलेटी जाड बॉर्डर

एकच दर द्यावा, एकापेक्षा जास्त दराचा विचार केला जाणार नाही, सोबत नमूना देण्यात यावा. अंदाजे नग ३००.

२. **<u>धार्मिक ग्रंथ :–</u>** ज्ञानेश्वरी ग्रंथ / बायबल / कुराण छापील किमतीवर जास्तीत जास्त वटाव देण्यात यावा. छापील किमतीपेक्षा जास्त दर देवू नये.

कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार सन २०१०–११ शालेय वर्षात वरील साहित्याचे पुरवठा करावा लागेल.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरी/–** | **स्वाक्षरी/–** |
| **अध्यक्ष,** | **शिक्षण प्रमुख,** |
| **शिक्षण मंडळ, पुणे महनगरपालिका** | **शिक्षण मंडळ, पुणे महनगरपालिका** |

**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**
**शिवाजी नगर, पुणे ४११००५.**
**वुलनशाली व धार्मिक ग्रंथ पुरविणेकामी निविदा अटी व शर्ती २०१०—११.**

पुणे सांजवार्ता व दैनिक केसरी दि. १/०९/१० मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा क्रं.२०/भांडार **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ पुरविणेकामी विहीत नमुन्यातील निवीदा फॉर्म व निवीदा अटी खालीलप्रमाणे:—**

शिक्षण मंडळ पुणे म.न.पा. पुणे शैक्षणिक वर्ष २०१०—११ चे करिता खालील परिशिष्ठ अ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून, परिशिष्ट क मध्ये नमून केलेल्या त्या त्या एकूण संख्येमध्ये **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ** विशिष्ट मुदतीत पुरवठा करण्यासाठी निविदा मागविण्यात येत असून, त्या निवीदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे.

**परिशिष्ठ अ**

**१. अटी व शर्ती :—**

१.निवीदा सीलबंद असली पाहिजे. दिलेल्या मुदतीत व वेळेत निवीदा आली नाही तर ती स्विकारली जाणार नाही.
२.निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असुन अ पाकीटमध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

**३अ.पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

**अ)** निवीदा रकमेच्या शेकडा १% या दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅकेचा मा. शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे काढलेल्या धनाकर्ष (DD) किंवा रोख भरणा कार्यालयात भरावा. २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ट १२ अन्वये संबंधित लघुउद्योगाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले तरच निवीदादारास बयाणा रक्कम व अनामत रकमेमध्ये सुट मिळेल अन्यथा त्याला एस.एस.आय.युनिट असले तरीसुध्दा बयाणा वरील रकमा रोख भराव्या लागतील.
**ब)** निवीदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र.
**क)**आर्थिक वर्ष २००९—१० मध्ये अद्ययावत व्हॅट भरल्याबाबतचा पुरावा तसेच मार्च २०१० अखेर व्हॅट क्लिअरन्स सर्टिफिकेट जोडावे.
**इ)**शासन अंगिकृत व इतर संस्थांना **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ** पुरवल्या बाबतची अनुभवाची कागदपत्रे किंवा प्रमाणपत्र.
**ई)**निवीदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याचा नोंदणी प्रमाण पत्राची (Pan No.) छायांकित प्रत, तसेच मागील ३ वर्षाचे इनकम टॅक्स रिटर्न प्रत.
**उ)** निवीदादार नोंदणीकृत सहकारी संस्था, नोंदणीकृत कपंनी किंवा नोंदणीकृत भागीदारी संस्था असेल तर संबंधित नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयीन संचालकांची किंवा भागीदारांची पुर्ण नावे, वय, पत्ते व संस्थेचे नोंदणीकृत दाखल्याची प्रत, संस्थेने सहीचे अधिकार दिल्याबाबतचे पत्र तसेच निवीदादार शासन किंवा शाासन अंगिकृत संस्था असेल तर त्याबाबतची सर्व कागदपत्रे.
**ए)** व्यवसायकर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवश्यक.

ऐ) निवीदादाराची निवीदा कामाची पुर्तता करण्यासंबंधिची आर्थिक क्षमता असल्याबाबतचे बॅकेचे प्रमाणपत्र (बॅक सॉलव्हान्सी) चालू वर्षाची निवीदेच्या एकूण किमतीच्या किमान २५ टक्के रकमेचे.

ओ) अ पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना शिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणीचे वेळी ठेकेदारांना समक्ष कामी सादर कराव्या लागतील.

४.अ पाकीटमध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास ब पाकीट उघडण्यात येणार नाही. याबाबत खरेदी समितीचा निर्णय अतिंम राहील.

५.पाकीट “ब” मध्ये निविदा धारकाने **वुलनशाली व धार्मिक ग्रंथाचे दर** सर्व करासह दर भरावेत व दोनही पाकीटे सिलबंद करून एका मोठया पाकीटात भरून त्या पाकीटावर निवीदा धारकाचे नाव, निवीदा क्रं.नमुद करून तो सिलबंद करून सादर करावा.

**६.निवीदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती.**

१. निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ** दर अंकी व अक्षरी लिहावेत.

२. निविदा स्विकारण्याचा,नाकारण्याचा पुर्ण अगर अशंतः मंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार खरेदी समितीस /मा.शिक्षण मंडळास राहिल.

३. निविदाकरिता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत संख्येत बदल करण्याचा अधिकार खरेदी समितीस/मा.शिक्षण मंडळास आहे.

४.मान्य निवीदा धारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन ७ दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्राकावर करार करणे बंधनकारक आहे.करार करण्यास निविदादाराने लेखी स्वरूपात असमर्थता दर्शविल्यास बयाण रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतुन काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

५.मान्य निवीदादारास करार करतेवेळी **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ** पुरवठयाच्या एकूण किंमतीच्या ५% रक्कम सुरक्षा/अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (DD)किंवा रोखीने भरावी लागेल.

६.निवीदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष २०१०—११ करिताच करार केल्यापासून बंधन कारक राहतील.

७. बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रकमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

८. **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ** पुरविण्याकरिता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा. खरेदी समितीस/मा.शिक्षण मंडळास राहिल.

९. दिलेल्या मुदतीत परिशिष्ठ ब मध्ये नमुदकेल्याप्रमाणे **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ** न पुरविल्यास निविदादराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निवीदादारास ब्लॅकलिस्ट करण्याचा अधिकार मा. खरेदी समितीस आहे व राहिल. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

१०.करारनाम्यानुसार पुरवठा करावयाचे **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ** कार्यालयाने दिलेल्या ठिकाणी स्वखर्चाने जकातीच्या रकमेसह पोहचविण्याची जबाबदारी निविदादारावर आहे.

११. करारनाम्यानुसार व परिशिष्ठ ब नुसार मुदतीत **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ** न आल्यास स्विकारले जाणार नाहीत मुदतीत न स्विकारलेले **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ** १० दिवसांच्या आत स्वखर्चाने संबंधित निविदादाराने त्या ठिकाणापासून स्वखर्चाने नेले पाहिजे ते न नेल्यास त्यास दररोज रू.५०००/— (अक्षरी रूपये पाच हजार फक्त ) प्रमाणे जागा भाडे आकारले जाईल व ३० दिवसांपेक्षा जास्त दिवस झाल्यास त्या मालाची जबाबदारी मा. शिक्षण मंडळावर राहणार नाही किंबहुना शिक्षण मंडळ संबधित नाकारलेल्या मालाची विल्हेवाट मनमानेल त्याप्रमाणे करेल.

१२.पुरवठा केलेले सर्व **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ** मोजून, घेवून दिलेल्या परिशिष्ठ ब प्रमाणे सर्व **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ** असल्याची खात्री मा.खरेदी समितीस झाल्याशिवाय बिल मिळणार नाही.कोणत्याही स्वरूपात हप्त्याने आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही ॲडव्हान्स रक्कमेची मागणी करता येणार नाही तसेच देय बिलातून आयकर कलम १९४ सी नुसार टीडीएसच्या रकमेची कपात केली जाईल.

१३.निविदादाराचे उत्पादक युनिटला करारनामा करण्यापूर्वी आवश्यकतेनुसार मा.खरेदी समिती/त्यांचे अधिकृत सभासदभेट देईल त्याकामी निविदादाराने सर्व सहकार्य केले पाहिजे.

१४.एकदा भरलेली निवीदा रदद् करता येणार नाही एखादयाला ती जर रदद् करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार खरेदी समितीस राहिल तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणून वसूल करण्यात येईल.

१५. मा.शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमुद केलेले काम मंजुर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम चेकने परत दिली जाईल. बयाणा रक्कम भरल्याची मुळ पावती मागणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१६. निविदादाराने **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ** पुरविण्यास तयार झालेली आहेत त्या संबधी पाहणी व तपासणी करण्याची विनंती खरेदी समितीस केली पाहिजे व तसे विनंती पत्र देणे आवश्यक आहे.

१७. **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ** पुरविण्याबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

१८.निविदा एकास/अनेकास देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार खरेदी समितीस आहे.

१९. **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ** सांगितलेल्या ठिकाणी पुरविल्यानंतर त्याची खरेदी समितीकडून पाहणी करण्यात येईल.पुरविलेले **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ** विहित नमुन्यात आहेत किंवा नाहीत हे पाहिले जाईल खराब किंवा स्पेसिफिकेशन प्रमाणे नसलेले **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ** कोणत्याही परिस्थितीत स्विकारली जाणार नाहीत.

२०. मंजुर केलेले साहित्य परिशिष्ठ ब प्रमाणे ठरवून दिलेल्या मुदतीत पुरवठा झाल्यानंतर पुरवठा केलेल्या **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ** एकत्रित देयक मा.शिक्षण प्रमुख शिक्षण मंडळ पुणे म.न.पा.पुणे यांच्या नावे या कार्यालयात सादर करावे लागेल. **वुलनशाली व धार्मिक ग्रंथ** पुरवठा करताना प्राप्त झालेली चलन्स स्वाक्षरी व शिक्यासह देयकासमवेत सादर करावी लागतील व पुणे मनपाकडील जकात विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत बिल देण्याबाबत कार्यवाही केली जाणार नाही.

२१. निविदा दिनांक ९/९/२०१० रोजी दुपारी ३ वाजता किंवा मा.शिक्षण मंडळाचे सोईनुसार उघडण्यात येतील.वेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वत: किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्या दिवशी निविदा न उघडलयास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनी वरुन कळविण्यात येईल. वेळी व त्याप्रसंगी निविदादारास हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

पुणे.

दिनांक:—

**स्वाक्षरी/—**
**अध्यक्ष**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.**

**स्वाक्षरी/—**
**शिक्षण प्रमुख**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.**

.......................................................................................................

# प्रतिज्ञालेख

मी,श्री.————————————————————————— वय ——— वर्ष, व्यवसाय — धंदा, राहणार ———————————————————————— निविदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,वरील निविदेच्या,फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निविदा भरलेली आहे व निविदेसोबत मला अटी व शर्ती मान्य आहेत. म्हणून सदर प्रतिज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे सही करुन निविदेसोबत दाखल करित आहे.

पुणे:—

दिनांक:—

**पुरवठा धारकाची नाव,सही व शिक्का**